

श्री गणेश चतुर्थीच्या सर्व गणेश भक्तांना मंगलमय शुभेच्छा!

दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

गणपती बाप्पा मोरया! मंगलमूर्ती मोरया!!

वर्ष : ०६ | अंक : ३१, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.१४ सप्टेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## ‘लालपरी’ सजली, चाकरमान्यांची पावले कोकणाकडे वळली...



**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.१३, मिरा - भाईंदर :** गणपती बाप्पाच्या आगमनाची चाहूल लागताच प्रत्येक चाकरमान्याचे मन आपल्या गावाची, कोकणातील मातीची आणि लालपरीच्या हॉर्नची वाट पाहू लागते. वर्षातून एकदा येणाऱ्या या सुखाच्या पर्वासाठी घराकडे निघालेल्या मिरा-भाईंदरमधील चाकरमान्यांचा हा प्रवास अधिक आनंददायी आणि सुखकर करण्यासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्हा पालकमंत्री प्रताप इंदिराबाई बाबुराव सरनाईक यांच्या माध्यमातून मोफत बस सेवेचा भव्य शुभारंभ शनिवार, दि. १२ सप्टेंबर रोजी रात्री ८.०० वाजता करण्यात आला. दरवर्षीप्रमाणे यंदा हि जे.पी. नॉर्थ, मिरा रोड पूर्व येथून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (चडठढउ) १०० हून अधिक ‘लालपरी’ टाळ-मृदंगाच्या गजरात, ‘गणपती बाप्पा मोरया’च्या जयघोषात कोकण, सातारा आणि कोल्हापूरच्या दिशेने रवाना झाल्या.

**सणाच्या आनंदात मोफत प्रवासाची जोड**

नोकरी-व्यवसायानिमित्त शहरात स्थायिक झालेला चाकरमानी गणेशोत्सवासाठी गावी जाताना महागाई आणि प्रवासाच्या अडचणींमुळे मेटाकुटीस येतो. हीच बाब लक्षात घेऊन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मिरा - भाईंदर शहरातील चाकरमान्यांसाठी प्रवाशांसाठी मोफत बस प्रवासाची सोय केली. गावी जाणाऱ्या प्रत्येक प्रवाशाच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि डोळ्यांतील समाधान स्पष्ट दिसत होते.

केवळ प्रवास मोफत देऊन हे कार्य थांबले नाही, तर गावी बाप्पाच्या पूजेसाठी लागणारे ‘पूजा साहित्य’ देखील प्रत्येक प्रवाशाला भेटवस्तू म्हणून देण्यात आले. या अनोख्या उपक्रमामुळे गावी जाणाऱ्या चाकरमान्यांचा उत्साह द्विगुणित झाला असून, मंत्र्यांनी पाठीवर मायेचा हात ठेवून बाप्पाच्या दर्शनासाठी सुखरूप पाठवले, अशा भावूक प्रतिक्रिया प्रवाशांनी दिल्या.

यावर प्रतिक्रिया देत मंत्री सरनाईक म्हणतात की, कोकणी माणसासाठी गणपती उत्सव म्हणजे केवळ सण नाही, तर तो आत्म्याचा विषय आहे. वर्षातून एकदा गावी जाणाऱ्या माझ्या चाकरमानी प्रवाशांचा प्रवास निर्विघ्न, सुरक्षित आणि आनंददायी व्हावा, हाच या उपक्रमामागील मुख्य हेतू आहे. बाप्पाच्या कृपेने हा सेवायज्ञ असाच अविरत सुरू राहील.

लालपरीतून निघताना चाकरमान्यांच्या मुखातून उमटणारा ‘गणपती बाप्पा मोरया’चा गजर संपूर्ण मिरा-भाईंदर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण करून गेला.

## ’काम नाही, वेतन नाही’ शासन निर्णय रद्द करा आ. सुधाकर अडबाले यांची मागणी




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१३, चंद्रपूर :** आदिवासी आश्रमशाळेतील शिक्षक - कर्मचारी यांच्यावर अन्याय करणारा ’काम नाही वेतन नाही’ हा दि. ८ जून २०१६ चा शासन निर्णय रद्द करण्यात यावा, अशी मागणी आ. सुधाकर अडबाले यांनी व संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांच्याकडे आयोजित बैठकीत लावून धरली. यावर शालेय शिक्षण विभागाच्या धर्तीवर आदिवासी विकास विभागातील अतिरिक्त कर्मचाऱ्यांचेही समायोजन होईपर्यंत वेतन सुरू ठेवण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात यावा व सदर बाब कर्मचारी हिताला बाधा आणणारी असल्यामुळे सदर शासन निर्णय परत घेण्यासाठी अधिकाऱ्यांना प्रस्ताव तयार करण्यास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी निर्देश दिले. आदिवासी आश्रमशाळा शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या ज्वलंत समस्यांबाबत आ. सुधाकर अडबाले यांच्या पुढाकाराने संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोकजी उईके यांच्यासोबत लोहगड बंगला, मुंबई येथे मंगळवारी (ता. ८) सायंकाळी बैठक पार पडली. बैठकीत दीर्घ सुट्टी विभागात काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना रजा रोखीकरण लागू करावे, अनुदानित आश्रम शाळेतील विशेष खास बाब म्हणून मान्यता देण्यात आलेल्या १४३३ कर्मचाऱ्यांचे थकबाकी वेतन अदा करण्यात यावी, शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षक व कर्मचारी यांचे वेतन एक तारखेला करण्यात यावे, १९८२/८४ ची जुनी पेन्शन योजना जशीची तशी लागू करण्यात यावी, कनिष्ठ महाविद्यालयीन संलग्न असलेल्या मुख्याध्यापकांना सहाव्या वेतन आयोगानुसार ४९०० ग्रेड पे तर सातव्या वेतन आयोगानुसार एस-१८ ही वेतनश्रेणी लागू करण्यात यावी, शाळा व वसतिगृह विभाग वेगळा करण्यात यावा, नवीन आकृतीबंध रद्द करून विलोपित झालेली पदे पुनर्जीवित करण्यात यावीत. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात वर्ग चार कर्मचाऱ्यांच्या पदांना मंजुरी देण्यात यावी, विना चौकशी कर्मचाऱ्यांवर छोट्या मोठ्या कारणासाठी निलंबनाची कार्यवाही करण्यात येऊ नये. शासकीय व अनुदानित आश्रम शाळेतील माध्यमिक शिक्षकांना तसेच पदवीधर प्राथमिक शिक्षकांना एकस्तर अंतर्गत ४८०० ग्रेडवेतन व प्राथमिक शिक्षकांना ४३०० ग्रेडवेतन लागू करण्यात यावे. सर्व आश्रम शाळांमधील लिपिक संवर्गाची पद भरती तातडीने करणेबाबत व इतर विषयांवर चर्चा करण्यात आली. या सर्व विषयांवर मंत्री डॉ. अशोक उईके यांनी सकारात्मक उत्तर देत प्रश्न निकाली काढण्याबाबत अधिकाऱ्यांना निर्देश दिले. बैठकी करिता मंत्रालय स्तरावरून उपसचिव जाधव, अवर सचिव गवस, कक्ष अधिकारी साखरे व घाडगे साहेब, अपर आयुक्त नाशिक पावरा, अपर आयुक्त नाशिक (मुख्यालय) दिगांबर चव्हाण हे प्रत्यक्ष उपस्थित होते तसेच इतर तीन अपर आयुक्त व आयुक्त महोदय हे ऑनलाईनच्या माध्यमातून उपस्थित होते.

यावेळी आदिवासयी विकास आश्रमशाळा शिक्षक व कर्मचारी संघटनेचे राज्याध्यक्ष डॉ. डी एल कराड, राज्य सरचिटणीस प्रा. बी टी भामरे, अमरावती विभागीय अध्यक्ष डॉ. अशोक झुंजारे, कोषाध्यक्ष प्रा. मांजरमकर, ठाणे विभागीय अध्यक्ष डॉ. प्रमोद पोगेरे, निलेश खापरे, नागपूर विभागीय अध्यक्ष आर.टी. खवशी, नाशिक विभागीय अध्यक्ष प्रा. अमोल वाबळे, नागपूर विभागीय उपाध्यक्ष यादव धानोरकर, विभागीय सहसचिव विकास जनबंधु, चंद्रपूर अनुदानित आदिवासी आश्रमशाळा संघटनेचे चंद्रपूर जिल्हाध्यक्ष प्रमोद साळवे, कार्यवाह मनोज आत्राम उपस्थित होते.

## पुढील चार दिवस पावसाचे! राज्यात वादळी पावसासह विजांचा कडकडाट

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१३, मुंबई :** राज्यातील काही भागांत पुढील चार दिवस वादळी वाऱ्यासह पाऊस आणि विजांच्या कडकडाटाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. ११ ते १४ सप्टेंबरदरम्यान विविध जिल्ह्यांत पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज असून, काही जिल्ह्यांना ‘यलो ॲलर्ट’ देण्यात आला आहे.



११ सप्टेंबरला नाशिक घाट परिसरासह परभणी, हिंगोली, नांदेड, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांत वादळी पावसाची शक्यता आहे. या जिल्ह्यांना यलो ॲलर्ट देण्यात आला आहे.

धुळे, नाशिक घाट व नाशिक, पालघर, ठाणे, मुंबई, मुंबई उपनगर, रायगड, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, बुलढाणा, जालना, बीड, धाराशिव, सोलापूर, लातूर, परभणी, नांदेड, हिंगोली, वाशिम, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांत वादळी वाऱ्यासह पाऊस आणि विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे.

१३ सप्टेंबरला कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील अनेक भागांत पावसाचा अंदाज आहे. पालघर, ठाणे, मुंबई, मुंबई उपनगर, रायगड, पुणे घाट, पुणे, सातारा घाट, सातारा, रत्नागिरी, नाशिक, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, बुलढाणा, जालना, बीड, धाराशिव, परभणी, हिंगोली, वाशिम, अकोला, अमरावती, यवतमाळ आणि वर्धा या जिल्ह्यांना ‘यलो ॲलर्ट’ देण्यात आला आहे. १४ सप्टेंबरला नाशिक घाट, पुणे घाट, पुणे, अहिल्यानगर आणि रत्नागिरी या जिल्ह्यांत वादळी पावसाची शक्यता असून, या भागांसाठीही ‘यलो ॲलर्ट’ जारी करण्यात आला आहे.

**कोणत्या भागात अलर्ट?**

- नाशिक घाट परिसर
- परभणी
- वर्धा
- हिंगोली
- चंद्रपूर
- नांदेड
- गोंदिया
- यवतमाळ
- गडचिरोली

**विजांचा कडकडाट; खबरदारीचे आवाहन**

वादळी वाऱ्यासह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. विजांचा कडकडाट सुरू असताना नागरिकांनी शक्यतो घरातच राहावे. झाडे, विजेचे खांब किंवा इतर धोकादायक ठिकाणी आसरा घेणे टाळावे; तसेच प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## दिवा-शिळ रोडवरील भोईर कंपाऊंडमध्ये FDA चा छापा

### ११ फरसाण कारखान्यांवर कारवाई, २० लाखांचा माल जप्त

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१३, खार्डी (ठाणे) :** दिवा-शिळ रोडवर शिळगाव आणि खार्डीगाव या दोन गावांच्या मध्ये असलेल्या भोईर कंपाऊंड, वास्कर कंपाऊंड परिसराच्या शेजारी असलेल्या बेकायदा फरसाण कारखान्यांवर अन्न व औषध प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे.

FDA आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या आदेशाने ९ सप्टेंबर रोजी झालेल्या या धाडसत्रात ११ आस्थापनांवर एकाच वेळी छापे टाकण्यात आले. यामध्ये २८,९५५ किलो तयार फरसाण आणि कच्चा माल व ५६ लिटर खाद्यतेल असा एकूण ₹२०.४८ लाख किमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे.





जप्त मालामध्ये बटाटा वेफर्स, फराळी चिवडा, मिक्स फरसाण, शेव, भाकरवडी, केळी चिप्स, शेजवान स्टिक्स आणि उत्पादनासाठी वापरले जाणारे मैदा, बेसन, पामतेल यांचा समावेश आहे.

**FDA ला काय आढळले?**

तपासणीत या कारखान्यांमध्ये अत्यंत अस्वच्छता आढळली. काही कारखान्यांकडे FSSAI परवाना नव्हता, जमीन तेलकट-चिकट, सांडपाण्याची व्यवस्था नाही, परिसरात दुर्गंधी, आत झुरळे-उंदीर आणि बाहेर जनावरांचा वावर. कामगारही सुरक्षा नियम न पाळता काम करत होते.

या सर्व ११ आस्थापनांचे परवाने निलंबित करून तात्काळ काम बंद (Stop Work) करण्याचे आदेश FDA ने दिले आहेत.

## श्री गणेशोत्सवासाठी नवी मुंबई महापालिका सज्ज; १७० कृत्रिम विसर्जन तलावांची व्यवस्था

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१३, नवी मुंबई :** श्रीगणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई महानगरपालिकेने नागरिकांच्या सोयीसाठी व्यापक व्यवस्था केली आहे. यंदा १४ ते २५ सप्टेंबरदरम्यान होणारा गणेशोत्सव इकोफ्रेंडली व प्लास्टिकमुक्त पद्धतीने साजरा करण्याचे आवाहन महापौर सुजाता पाटील आणि महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे.

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना मंडप उभारणीसाठी ऑनलाईन परवानगीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून १४० हून अधिक मंडळांनी अर्ज केले आहेत. संबंधित विभागांच्या परवानग्या एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. न्यायालयाच्या आदेशानुसार आणि शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ६ फूटांपर्यंतच्या श्रीमूर्तींचे कृत्रिम तलावात विसर्जन करण्यासाठी तब्बल १७० कृत्रिम विसर्जन तलाव उभारण्यात आले आहेत. बेलापूर २२, नेरुळ २९,



वाशी १६, तुर्भे २१, कोपरखैरणे १६, घणसोली १६, ऐरोली २५ आणि दिघा २५ अशा विभागनिहाय व्यवस्था करण्यात आली आहे. याशिवाय २२ नैसर्गिक विसर्जन स्थळे असून एकूण १९२ विसर्जन स्थळांवर व्यवस्था करण्यात आली आहे.

विसर्जन स्थळांवर स्वयंसेवक, लाईफगार्ड्स, अग्निशमन जवान, सीसीटीव्ही, विद्युत व जनरेटरची व्यवस्था करण्यात आली आहे. २२ ठिकाणी वैद्यकीय पथके तैनात असतील. नैसर्गिक विसर्जन स्थळांवर तराफ्यांचीही व्यवस्था करण्यात आली आहे.

निर्माल्य जलाशयात टाकू नये यासाठी ओल्या व सुक्या निर्माल्यासाठी स्वतंत्र कलश ठेवण्यात आले असून तुर्भे येथील प्रकल्पस्थळी निर्माल्य विल्हेवाटीची व्यवस्था करण्यात आली आहे. आगमन-विसर्जन मार्गांवरील रस्ते दुरुस्ती आणि झाडांच्या फांद्यांची छाटणी करण्यात आली आहे. महापालिका, पोलीस, वाहतूक पोलीस व इतर संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय ठेवण्यात आला आहे.

‘माझी वसुंधरा’ अभियानात नवी मुंबईला ‘क’ वर्ग महानगरपालिकांमध्ये राज्यातील प्रथम क्रमांकाचे पर्यावरणशील शहर म्हणून मानांकन मिळाले आहे. त्यामुळे नागरिकांनी कृत्रिम तलावांचा अधिकाधिक वापर करून जलप्रदूषण रोखण्यास हातभार लावावा आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहन महापौर सुजाता पाटील व आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे.

## बोरीत प्रतिबंधित गुटख्यावर पोलिसांची कारवाई!

**अक्षराज : जफर शेख**

**दि.१३, जिंतूर :** तालुक्यातील बोरी पोलिसांनी प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त करत एका व्यक्तीला ताब्यात घेतले. ही कारवाई जावेद पान शॉपच्या पाठीमागील गादी घरातील खालच्या खोलीत करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शेख साजीद शेर मोहम्मद वय वर्ष ३९, रा. नामदेव नगर, बोरी याच्याकडे शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ विक्रीच्या उद्देशाने बाळगल्याचे आढळून आले. कारवाईत विमल सुगंधित पानमसाला, रजनीगंधा पानमसाला, आर.एम.डी. गुटखा, राजनिवास पानमसाला, के.एम.०१ जर्दा, गोवा गुटखा, आर.एन.०१ व व्ही.वन तंबाखूसह पिवळ्या व सिल्वर पन्नीतील तंबाखू असा साठा जप्त करण्यात आला. तसेच एक अँड्रॉइड मोबाईलही जप्त करण्यात आला. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत २७ हजार ८४० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

या प्रकरणी बोरी पोलीस ठाण्यात गु.र.नं. २६६/२०२६ अन्वये BNS कलम १२३, २२३, २७४, २७५ तसेच सिगारेट व इतर तंबाखू उत्पादने कायदा २००३ मधील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई सहा. पोलीस निरीक्षक अभिजीत आडके यांच्या मार्गदर्शनाखाली संघसेन कांबळे, शेख वसीम, राजेश जटाळ, सय्यद रियासोद्दीन व सय्यद मोबीन यांच्या पथकाने केली. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अभिजीत आडके करीत आहेत. आरोपी सध्या पोलिसांच्या ताब्यात आहे

बोरी पोलीस ठाणे हद्दीतील अवैध धंदे करणाऱ्यांची गय केली जाणार नाही. अवैध गुटखा, तंबाखूजन्य पदार्थांची विक्री तसेच इतर गैरकायदेशीर व्यवसाय करणाऱ्यांवर पोलिसांची करडी नजर आहे. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी सातत्याने कारवाई केली जाणार असून, कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा पवित्रा आम्ही हाती घेतला आहे, असा स्पष्ट इशारा बोरी पोलीस ठाण्यात नव्याने रुजू झालेले सहाय्यक पोलीस निरीक्षक अभिजीत आडके यांनी दिला.

अक्षराज






# दणदणाट थांबवा,दुष्काळाच्या हाका ऐका

डीजे वा ध्वनिक्षेपकांच्या आवाजाचे डेसिबल हल्ली वाढले आहेत. त्यात समर्थन-विरोधाच्या नारेबाजीची भर पडल्याने हा आवाज अधिकच कर्णकर्कश झाला. किंबहुना, तो तसाच बनावा, गोंगाट वाढावा, याचीच जणू खबरदारी घेतली जात आहे. या दणदणाटामुळे लोकांचे आरोग्य बिघडते आहेच; पण राज्याचे आरोग्य आणि सामाजिक स्वास्थ्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे. पावसाने ओढ दिल्याने पाणीटंचाई आणि संभाव्य दुष्काळ यांसारखे गंभीर प्रश्न या गदारोळात दाबले गेले आहेत. मूळ समस्या मागे पडत आहेत. त्यांच्या सोडवणुकीला प्राथमिकता मिळायला हवी; सणावारातील जल्लोषाला नव्हे.

यंदा मान्सून अंमळ उशिरा दाखल झाला. जुलैमध्ये त्याने काहीसा दिलासा दिला, काही धरणेही तुडुंब भरली; परंतु ऑगस्टमधील खंडाने शेतशिवारापुढे गंभीर आव्हाने उभी ठाकली आहेत. अनेक वर्षांत राज्य प्रथमच श्रावणसरींना पारखे झाले. पाऊस लांबला किंवा त्याची तूट राहिली, तरी सह्याद्री आणि त्याच्या डोंगररांगा या काळात हिरवाईने नटलेल्या दिसतात. यंदा मात्र १ जून ते ५ सप्टेंबरदरम्यान पावसाची १७ टक्के तूट नोंदवली गेली. शेतातील उभी पिकेच नव्हे, तर डोंगरांवरील हिरवाईही कोमजली. ती जणू 'आम्हाला वाचवा' अशी साद घालत आहे; पण दणदणाटाने बहिरी झालेली व्यवस्था ती ऐकण्याच्या स्थितीत दिसत नाही. जुलैतील चांगल्या पावसामुळे राज्यातील तीन हजारांहून अधिक धरणांतील पाणीसाठ्याचे वरवरचे चित्र समाधानकारक वाटते. मात्र, विभागनिहाय तफावत हा काळजीचा मुद्दा. कोकणातील धरणांत नव्वद टक्क्यांहून अधिक साठा दिसतो; पण मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत तो दहा-बारा टक्क्यांवर असणे, हा टोकाचा विरोधाभास. म्हणजे धरणे पूर्णपणे रिकामी नसली, तरी पिण्याच्या पाण्याची चिंता मिटली आहे, असे ठामपणे म्हणता येत नाही. या तफावतीकडे दुर्लक्ष झाल्यास भविष्यातील चित्र विदारक असेल. मराठवाड्यातील आठही जिल्हे पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. या विभागात पेरणीक्षेत्र पाच वर्षांच्या सरासरीपेक्षा सुमारे सात टक्क्यांनी घटले आहे. पावसाची तूट वीस टक्क्यांहून अधिक असून, परभणी आणि लातूरमध्ये ती सर्वाधिक तीव्र आहे. कापूसक्षेत्रात कमालीची घट झाली, ऊसक्षेत्र मोठ्या प्रमाणात कमी झाले आणि शेतकऱ्यांनी सोयाबीनकडे वळण्याचा प्रयत्न केला; परंतु आता सोयाबीन पावसाअभावी माना टाकू लागल्याने हा विभाग संकटाचा केंद्रबिंदू आहेच; पण विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रातही पाऊसपाणी व पिकांची अवस्था संमिश्र असल्याने चिंता वाढते आहे. सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद, मका, भाजीपाला, डाळिंब, कांदा अशी पिके करपू लागली आहेत. पिकांना बाटलीने पाणी देण्याची वेळ शेतकऱ्यांवर येत असेल, तर नजीकच्या संकटाचा अंदाज यावा. सप्टेंबर कोरडा गेला, तर संपूर्ण खरीपच अडचणीत येऊ शकतो. ऐंशी-नव्वद टक्के पेरणी झाली म्हणजे हंगाम वाचला, असे म्हणता येत नाही. खरी कसोटी पिके जगविण्याची आणि त्यांची उत्पादनक्षमता टिकविण्याची आहे. येत्या काळात विहिरी, बोअरवेल आणि लहान-मोठ्या तलावांवरील ताण वाढत जाईल. शेती, उद्योग, शहरे या तिन्ही घटकांना मोठ्या प्रमाणात पाणी लागते आणि ते मिळाले नाही तर विकासाचा वाटाच बंद होऊ लागतात. यापैकी कोणतेही एक क्षेत्र होरपळल्यास नुकसान ठरलेले. परंतु, संकट आस्मानी असो की सुल्तानी, शेतीला फटका बसल्यास त्याचे दूरगामी परिणाम जाणवतात. बाजारपेठ, वाहतूक, सहकारी संस्था, दूध व्यवसाय आणि रोजगार यांवर त्याचे सावट पडते. ग्रामीण अर्थसाखळी विस्कळित होते. तूर्तास महाराष्ट्र दुष्काळाच्या उंबरठ्यावर उभा आहे, असे म्हणता येईल; परंतु दुष्काळाची चाहूल संकटात परिवर्तित होऊ नये, ही सरकार आणि समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. दुष्काळ केवळ पावसाच्या टक्केवारीने ठरत नाही. पाऊस कधी पडला, किती दिवसांचा खंड पडला, पिकांना कोणत्या अवस्थेत पाणी मिळाले, भूजल किती शिल्लक आहे आणि पिण्याच्या पाण्याचे स्रोत खरोखरच टिकाऊ आहेत का, यावर खरी परिस्थिती अवलंबून असते. म्हणूनच तालुकानिहाय आढावा, पिकांचे पंचनामे, टँकर नियोजन, चारा उपलब्धता आणि पीकविमा दाव्यांची पूर्वतयारी आवश्यक आहे. दुर्दैवाने यात आपण कमी पडतो. कोरड्या आभाळाची छाया अधिक गडद होत असताना केवळ घोषणा पुरेशा नाहीत. आजची टंचाई उद्याच्या दुष्काळात रूपांतरित होऊ द्यायची नसेल, तर प्रशासनाने तातडीने कामाला लागले पाहिजे. शेवटी हा केवळ कमी पावसाचा प्रश्न नाही; तो जलसुरक्षा, अन्नसुरक्षा आणि एकुणात अर्थव्यवस्थेच्या स्थैर्याचा विषय आहे. गोंगाट थांबवून हा आवाज ऐकला नाही, तर महाराष्ट्राला त्याची मोठी किंमत चुकवावी लागेल.

**– संपत थेटे**

# महाराष्ट्रातील आत्महत्यांचे वाढते प्रमाण चिंताजनक

आत्महत्या ही केवळ एखाद्या व्यक्तीच्या जीवनाशी संबंधित घटना नसून ती कुटुंब, समाज आणि संपूर्ण व्यवस्थेसमोर उभे राहिलेले गंभीर आव्हान आहे. महाराष्ट्रात आत्महत्यांचे वाढते प्रमाण चिंतेचा विषय बनले आहे. विशेषतः तरुण विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये वाढणारी मानसिक अस्वस्थता समाजाने गांभीर्याने घेण्याची गरज आहे. वृत्तपत्रातील आकडेवारीही या समस्येचे गांभीर्य अधोरेखित करते. त्यामुळे आत्महत्यांकडे केवळ आकडे म्हणून न पाहता त्यामागील सामाजिक, आर्थिक आणि मानसिक कारणांचा शोध घेणे आवश्यक आहे.

आजच्या धावपळीच्या जीवनात आर्थिक अडचणी, बेरोजगारी, कर्जबाजारीपणा, कौटुंबिक समस्या, नातेसंबंधांतील ताण, शैक्षणिक दबाव, भविष्यातील अनिश्चितता आणि एकटेपणा यामुळे अनेकांना मानसिक तणावाचा सामना करावा लागतो. ग्रामीण भागात शेतीशी संबंधित अडचणी आणि आर्थिक अस्थिरता तर शहरी भागात स्पर्धात्मक जीवनशैली व वाढता मानसिक ताण ही चिंतेची कारणे आहेत.

विद्यार्थ्यांमध्ये वाढणारा ताण विशेष चिंताजनक आहे. परीक्षेतील गुण, पालकांच्या अपेक्षा, प्रवेशाची स्पर्धा, करिअरची चिंता आणि मित्रांशी होणारी तुलना यामुळे काही विद्यार्थ्यांवर अनावश्यक मानसिक दबाव निर्माण होतो. मुलांनी प्रत्येक क्षेत्रात अव्वल असलेच पाहिजे, असा आग्रह पालकांनी धरू नये. अपयश हा जीवनाचा शेवट नसून शिकण्याची आणि पुन्हा प्रयत्न करण्याची संधी आहे, हा सकारात्मक दृष्टिकोन विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे गरजेचे आहे.

ज्येष्ठ नागरिकांच्या मानसिक आरोग्याकडेही दुर्लक्ष करून चालणार नाही. बदलती कुटुंबव्यवस्था, मुलांचे स्थलांतर, एकटेपणा, आरोग्याच्या समस्या आणि सामाजिक संपर्क कमी होणे यामुळे त्यांच्यामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होऊ शकते. कुटुंबातील सदस्यांनी ज्येष्ठांशी नियमित संवाद साधणे, त्यांना निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेणे आणि त्यांच्या भावनांना महत्त्व देणे आवश्यक आहे.

आत्महत्या रोखण्यासाठी मानसिक आरोग्याविषयी खुलेपणाने बोलण्याची संस्कृती निर्माण झाली पाहिजे. मानसिक तणाव म्हणजे कमजोरी नसून तोही आरोग्याशी संबंधित प्रश्न आहे, हे समाजाने स्वीकारले पाहिजे.

शाळा-महाविद्यालयांमध्ये समुपदेशकांची उपलब्धता वाढवावी. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या वर्तनातील बदलांकडे संवेदनशीलतेने पाहावे. पालकांनी केवळ अभ्यास आणि गुणांबाबत



विचारपूस न करता मुलांच्या भावनिक स्थितीबद्दलही संवाद साधावा.

सोशल मीडियामुळेही तरुणांमध्ये स्वतःची इतरांशी तुलना करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. इतरांचे यश, आर्थिक स्थिती किंवा जीवनशैली पाहून स्वतःला कमी लेखण्याची भावना निर्माण होऊ शकते. त्यामुळे सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर आणि प्रत्यक्ष माणसांशी संवाद यांचे महत्त्व समजावून सांगणे गरजेचे आहे.

कुटुंबातील संवाद हा या समस्येवरचा सर्वांत महत्त्वाचा आधार ठरू शकतो. एखादी व्यक्ती सतत निराश दिसत असेल, एकटी राहण्याचा प्रयत्न करत असेल किंवा जीवनाबद्दल अत्यंत नकारात्मक बोलत असेल, तर तिची थट्टा किंवा टीका करण्याऐवजी तिचे म्हणणे शांतपणे ऐकले पाहिजे. गरज भासल्यास विश्वासू व्यक्ती, समुपदेशक किंवा मानसिक आरोग्यतज्ज्ञांची मदत घेण्यासाठी तिला प्रोत्साहित केले पाहिजे.

सरकारने मानसिक आरोग्य सेवा अधिक सुलभ आणि सर्वसामान्यांच्या आवाक्यात आणण्याबरोबरच ग्रामीण भागातही समुपदेशनाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज आहे. शेतकरी, विद्यार्थी, कामगार, महिला आणि ज्येष्ठ नागरिक अशा विविध घटकांसाठी स्थानिक पातळीवर मदतव्यवस्था मजबूत झाली पाहिजे. माध्यमांनीही आत्महत्यांच्या बातम्यांचे वार्तांकन करताना संवेदनशीलता आणि जबाबदारी पाळणे आवश्यक आहे.

आत्महत्या रोखणे ही केवळ शासनाची जबाबदारी नाही; ती कुटुंब, शैक्षणिक संस्था, समाज आणि प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. आकडेवारी कमी करण्याबरोबरच त्यामागची कारणे कमी करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. माणसांमधील संवाद, आपलेपणा आणि आधार वाढला तर अनेक संकटांना सामोरे जाण्याची ताकद निर्माण होऊ शकते. कोणत्याही व्यक्तीला तिच्या अडचणींमध्ये एकटे पडू न देणे, हाच आत्महत्या प्रतिबंधाचा खरा सामाजिक मार्ग आहे.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# फिरकीचा जादूगार शेन वॉर्न

फिरकीचा जादुगार शेन वॉर्न याची आज जयंती. साडेचार वर्षापूर्वी ( ४ मार्च २०२२ ) रोजी क्रिकेट विश्वाला धक्का देणारी बातमी आली आणि या बातमीने संपूर्ण क्रिकेट विश्वावर शोककळा पसरली. ही बातमी होती फिरकीचा जादूगार ऑस्ट्रेलियाचा महान लेग स्पिनर शेन वॉर्न यांच्या निधनाची. शेन वॉर्नच्या आकस्मिक निधनाची बातमी क्रिकेट रसिक पचवू शकले नाही. अनेकांचा या बातमीवर विश्वास बसत नव्हता. शेन वॉर्न असा अकाली निघून गेल्याने क्रिकेट विश्वाला जबर धक्का बसला. शेन वॉर्न जाऊन आज साडेचार वर्ष झाली तरी या धक्क्यातून क्रिकेट रसिक अजूनही सावरू शकले नाही. वयाच्या अवघ्या ५२ व्या वर्षी या महान गोलंदाजाने जगाचा निरोप घेतला. शेन वॉर्न हा केवळ ऑस्ट्रेलियाचाच नाही तर जगातला सर्वोत्तम फिरकी गोलंदाज होता. आपल्या फिरकीच्या तालावर त्याने जगातील सर्वच दिग्गज फलंदाजांना नाचवले. जवळपास वीस वर्ष त्याने आपल्या फिरकीच्या बळावर क्रिकेट विश्वावर राज्य केले.

१३ सप्टेंबर १९६९ रोजी ऑस्ट्रेलियाच्या फॉन्टरी गली येथे जन्मलेल्या



शेन वॉर्नने जेंव्हा फिरकी गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला तेंव्हा त्याला सर्वांनी वेड्यात काढले कारण ऑस्ट्रेलिया म्हणजे वेगवान गोलंदाजांची भूमी . खेळपट्ट्या वेगवान त्यामुळे तिथे त्याची फिरकी चालणार नाही असेच सर्वांचे मत होते. अनेकांनी त्याला फिरकी गोलंदाजी न करण्याचा सल्ला दिला मात्र त्याने कोणाचेही ऐकले नाही. तो आपल्या निर्णयावर ठाम राहिला.

देशांतर्गत क्रिकेटमध्ये त्याने चमकदार कामगिरी करून निवड समितीचे लक्ष वेधले. सातत्याने चांगली गोलंदाजी केल्याने अखेर त्याला ऑस्ट्रेलियाच्या मुख्य संघात प्रवेश मिळाला. १९९२ साली त्याने भारताविरुद्धच त्याने आपली पहिली कसोटी खेळली मात्र या कसोटीत त्याला विशेष काही करता आले नाही. भारताच्या फलंदाजांनी त्याची गोलंदाजी लीलिया खेळून काढली. याच कसोटीत भारताचा सलामीवीर रवी शास्त्रीने द्विशतक केले. पहिल्या कसोटीत विशेष काही करता न आल्याने त्याच्यावर टीकाही झाली. तो आंतरराष्ट्रीय स्तरावर यशस्वी होणार नाही असाही तर्क अनेकांनी काढला मात्र त्याने हार मानली नाही. टिकाकारांकडे दुर्लक्ष केले आणि आपल्या गोलंदाजीवर लक्ष केंद्रित केले. त्याचे फळ त्याला लवकरच मिळाले. इंग्लंड विरुद्धच्या प्रतिष्ठेच्या एशेस मालिकेत त्याने इंग्लंडच्या फलंदाजांना सलो की पळो करून सोडले.

आपल्या फिरकीच्या बळावर त्याने ही मालिका ऑस्ट्रेलियाला एकहाती जिंकून दिली. इंग्लंड फलंदाजांना शेन वॉर्नची फिरकी समजलीच नाही. इंग्लंड फलंदाजांना शेन वॉर्नने अक्षरशः मामा बनवले. याच मालिकेत शेन वॉर्नने असा चेंडू टाकला की ज्याने फलंदाजच नव्हे तर क्रिकेट विश्वच अचंबित झाले. शेन वॉर्नने इंग्लंडच्या माईक गार्टिंगला ऑफ साईडला चेंडू टाकला. गार्टिंगला वाटले की चेंडू ऑफ स्टंपच्या बाहेर असल्याने तो वाईड ठरेल म्हणून त्याने तो सोडून दिला मात्र चेंडूने अचानक १८० अंशात वळून चक्क गार्टिंगचा लेग स्टंपवर धडकला. या चेंडूने केवळ फलंदाजच नव्हे तर क्रिकेट विश्वच हादरून गेले. असा चेंडू यापूर्वी क्रिकेट विश्वात कोणत्याची गोलंदाजाने टाकला नव्हता म्हणूनच या चेंडूला बॉल ऑफ सेंच्युरी असे म्हणतात. न भूतो न भविष्यती असा तो चेंडू होता. १९९३ साली शेन वॉर्नने हा स्वप्नवत चेंडू टाकला. आज इतक्या वर्षानंतरही हा चेंडू क्रिकेट रसिकांच्या स्मरणात आहे.

शेन वॉर्नची गोलंदाजीची शैली अनोखी होती. या अनोख्या शैलीनेच त्याने १४५ कसोटीत ७०८ बळी घेतले. त्यातील ४४८ बळी हे ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडमध्ये घेतले. येथे एक लक्षात घ्यावे लागेल की या दोन्ही देशातील खेळपट्ट्या वेगवान गोलंदाजीसाठी पोषक असतात. वेगवान खेळपट्ट्यांवर इतके बळी मिळवणे ही अनन्यसाधारण गोष्ट आहे. त्याने १४५ कसोटीत खेळताना ३७ वेळा एका डावात ५ किंवा त्यापेक्षा अधिक बळी घेतले आहेत तर तर कसोटीत १० किंवा १० पेक्षा अधिक बळी त्याने १० वेळा घेतले आहेत. इतकेच नाही तर त्याने १९४ एकदिवसीय सामन्यात २९३ बळी घेतले आहेत. १९९९ साली इंग्लंडमध्ये झालेला विश्वचषक ऑस्ट्रेलियाने शेन वॉर्नच्या फिरकीच्या बळावरच जिंकला होता.

शेन वॉर्नने जगभरातील दिग्गज फलंदाजांना आपल्या फिरकीच्या तालावर अक्षरशः नाचवले. जगातील सर्वच देशात त्याने अप्रतिम कामगिरी करीत बळी मिळवले मात्र त्याला भारतात म्हणावे तसे यश मिळाले नाही. सचिन आणि वॉर्न यांचे क्रिकेट मैदानावरील द्वंद्व क्रिकेट रसिकांसाठी पर्वणी ठरायचे. सचिनला बाद करण्यासाठी वॉर्न जंग जंग पछडायचा मात्र त्याला त्यात यश मिळायचे नाही. शारजात झालेल्या मालिकेत सचिनने वॉर्नची चांगलीच पिटाई केली तेंव्हा सचिन मला स्वप्नातही दिसतो अशी कबुली त्याने दिली होती. मैदानावर हे दोन महान खेळाडू एकमेकांसमोर उभे ठाकत असले तरी मैदानाबाहेर मात्र हे दोघे एकमेकांचे जिवलग मित्र होते. १९९० ते २०१० असे वीस वर्ष ऑस्ट्रेलियाने क्रिकेट विश्वावर एकहाती हुकूमत गाजवली त्यात शेन वॉर्नचा मोठा वाटा होता.

निवृत्तीनंतर शेन वॉर्नने समालोचन केले. २००८ साली आयपीएलचा पहिले सत्र पार पडले. या पहिल्या सत्रात शेन वॉर्न राजस्थान रॉयल्स या संघाचा कर्णधार होता. विशेष म्हणजे या संघात शेन वॉर्न वगळता एकही स्टार खेळाडू नव्हता. या संघात तरुण आणि नवख्या खेळाडूंचा भरणा होता तरीही शेन वॉर्नने आपल्या चतुरस्त्र गोलंदाजीने आणि नेतृत्व गुणाने राजस्थान रॉयल्स ला विजेतेपद मिळवून दिले.

शेन वॉर्नच्या मृत्यू नंतर क्रिकेट विश्वाची मोठी हानी झाली. त्याच्या सारखा महान फिरकी गोलंदाज पुन्हा होणार नाही. फिरकीचा जादूगार शेन वॉर्नला जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## महोत्सव

मोरया मोरया गजरी
श्रीबाप्पा विराजमान
आवाहन गणरायाचे
आनंदा आले उधाण

मिरवणूकी उत्साहात
मात्रराखे समाजभान
शास्त्रोक्तमंत्रोच्चारात
उजळे भक्तीचेलुभान

डि जे संयमी वाजला
राखे डेसिबलसन्मान
शाबीत राहतात कान
उंचावे सुखानंदे मान

पर्यावरण पूरक मूर्त्यां
होई निसर्गा अभिमान
आरासही देखणे छान
विषय सार्थ उर्जावान

रक्त दान अवयव दान
कुठेभुकेल्या अन्नदान
अभिनव उपक्रम रंगे
कार्यक्रम जोडे संधान

व्याख्यानमालारंगल्या
कलाकारास्तव खदान
गणराज कलांचे दैवत
कित्येकां सुसंधीप्रदान

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# अतिउत्साही कार्यकर्त्यांवर नियंत्रण ठेवा !

गणेशोत्सव काळात मुंबईतील लालबाग, परळ, गिरगाव ही खास आकर्षण केंद्र असतात. मुंबईतीलच नव्हे, तर राज्यासह देश विदेशातील भाविक, पर्यटक या ठिकाणी गणपती पाहण्यासाठी दरवर्षी गर्दी करतात. लांबच लांब रांगा, रस्त्यावरील विद्युत रोषणाई आणि विक्रेत्यांनी समस्त परिसर दिवस रात्र गजबजलेला असतो.

या कालावधीत गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांना मात्र वेगळेच बळ आलेले असते. तीन वर्षांपूर्वी पहिल्याच दिवशी लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी आलेल्या एका भाविक महिलेला सुरक्षा रक्षकांकडून धक्काबुक्की करण्यात आली. अन्य प्रसिद्ध गणेशोत्सव मंडळांच्या ठिकाणीही अशा स्वरूपाच्या घटना दरवर्षी घडत असतात.

दूरवरचा प्रवास करून तासन तास रांगेत उभे राहणाऱ्या भक्तांना धक्काबुक्की करणे, त्यांच्याशी विनाकारण वाद घालणे, शिवीगाळ करणे, धमकावणे, स्त्रियांशी असभ्य भाषेत बोलणे, परिचयाच्या माणसांना रांगेत पुढे घेऊन जाणे यांसारखे प्रकार काही मंडळाच्या कार्यकर्त्यांकडून घडताना सर्रासपणे पाहायला मिळतात. त्यामुळे गणेशोत्सवाचा राजा नेमका कोण ? गणपती कि कार्यकर्ता हा प्रश्नच पडतो. कार्यकर्त्यांच्या अशा वागण्याने मंडळासह उत्सवाच्या प्रतिमेलाही धक्का लागतो. त्यामुळे अशा अतिउत्साही कार्यकर्त्यांवर मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी नियंत्रण ठेवण्याची नितांत आवश्यकता आहे.

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज






# विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे गरजेचे - जादूगार शिरोळे

## ढोकेश्वर विद्यालयात जादूच्या प्रयोगातून अंधश्रद्धा निर्मूलनाचा संदेश



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१३, पारनेर (अहिल्यानगर) :** जादू ही केवळ हातचलाखी, कौशल्य आणि विज्ञान आहे. जादूगार मनोरंजनासाठी जादू करतो, तो स्वतःला देव किंवा चमत्कारी शक्तीचा धनी म्हणवत नाही. मात्र भोंदू बाबा त्याच प्रयोगांना दैवी चमत्काराचे स्वरूप देऊन समाजाची फसवणूक करतात. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासूनच वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे अत्यंत गरजेचे आहे, असे आवाहन महाराष्ट्रातील प्रसिद्ध जादूगार प्रकाश शिरोळे यांनी केले.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या टाकळी ढोकेश्वर येथील श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात 'आनंददायी शनिवार' उपक्रमांतर्गत जादू प्रयोगाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते.

यावेळी शिरोळे यांनी विज्ञानावर आधारित अनेक थरारक आणि मनोरंजक जादूचे प्रयोग सादर केले. प्रत्येक प्रयोगामागील वैज्ञानिक कारण आणि हातचलाखीचे रहस्य त्यांनी विद्यार्थ्यांना उलगडून सांगितले. अंधश्रद्धा कशी निर्माण होते आणि भोंदूगिरी कशी ओळखावी, याबाबतही त्यांनी प्रबोधन केले. या कार्यक्रमाचा इयत्ता ५ वी ते १२ वीच्या सुमारे १३०० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. अनेक विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रयोगात सहभाग घेऊन जादूचा आनंद लुटला. कार्यक्रमास प्राचार्य बाळासाहेब खिलारी, पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे, शास्त्र समन्वयक अशोक गांगड, कला समन्वयक राजेंद्र ढोणे, भांडार प्रमुख प्रा. देविदास आठरे, परीक्षा प्रमुख बाबासाहेब जाधव, प्रसिद्ध गीतकार अरुण वाळुंज यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अतुल सैद यांनी केले, तर पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे यांनी आभार मानले.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची नवी मुंबई कार्यकारिणी जाहीर

**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.१३, नवी मुंबई :** पत्रकारांच्या प्रश्नांना संघटितपणे वाचा फोडण्यासह पत्रकारांच्या हक्कांसाठी अधिक प्रभावीपणे कार्य करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या नवी मुंबई युनिटच्या कार्यकारिणीची पुनर्रचना करण्यात आली आहे. नवी मुंबई कोकण विभागीय कार्यालयात झालेल्या बैठकीत नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष निलेश सोमानी, प्रदेश संघटक संजय भोकरे, महासचिव डॉ. विश्वासराव आरोटे, प्रसिद्धीप्रमुख नवनाथ जाधव आणि कोकण विभाग अध्यक्ष राजेश खराडे यांच्या मार्गदर्शनाखाली १० सप्टेंबर रोजी कार्यकारिणीची बैठक पार पडली.

बैठकीत संघटनेच्या आगामी कार्याची दिशा, पत्रकारांच्या विविध अडचणी आणि प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. पत्रकारांच्या प्रश्नांसाठी संबंधित यंत्रणांकडे प्रभावी पाठपुरावा करणे, पत्रकारांच्या हिताचे उपक्रम राबविणे तसेच नवी मुंबई आणि कोकण विभागात संघटनेचे कार्य अधिक सक्षम करण्याबाबत पदाधिकाऱ्यांनी विचार मांडले.

**यानंतर नवी मुंबई युनिटची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. त्यामध्ये,**

**अध्यक्ष :** दशरथ शांताराम चव्हाण, **कार्याध्यक्ष :** जे. के. पोळ, **उपाध्यक्ष :** कल्याण हरिभाऊ हणवते, सचिव : विष्णू सुखदेव बुरे, खजिनदार : अस्ते आलम मिर, सल्लागार : सुनील गायकवाड, सल्लागार : सुभाष फकीरा जाधव, वाशी विभाग प्रमुख : दीपक जयराम सोनवणे, सदस्य : समीर मेहबूब शेख, सदस्य : संतोष जगन्नाथ गोळे, सदस्य : कल्याण हरून शहा, सदस्य : सुरेश मनोहर दुधाणे, सदस्य : विनोद बाबाराव धुरंधर, सदस्य : जितेंद्र साईनाथ चव्हाण

नवीन कार्यकारिणीच्या माध्यमातून नवी मुंबईतील पत्रकारांना भेडसावणाऱ्या विविध प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा करण्याचा तसेच पत्रकारांच्या हितासाठी संघटितपणे कार्य करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. संघटनेचे कार्य तळागाळापर्यंत पोहोचवून अधिकाधिक पत्रकारांना संघटनेशी जोडण्याबरोबरच नवी मुंबईसह कोकण विभागात विविध उपक्रम राबविण्याचेही निश्चित करण्यात आले.

नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे यावेळी अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# मुख्यमंत्री फडणवीस, अभिनेता जॉकी श्रॉफ यांच्यासह विदेशी पाहुण्यांचीही मारबत महोत्सवाला उपस्थिती

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१३, नागपूर :** शहराची अतिशय जुनी, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक परंपरा असलेल्या मारबत महोत्सवाला यावर्षी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह प्रसिद्ध अभिनेते जॉकी श्रॉफ, ज्येष्ठ दिग्दर्शक सुभाष घई, अभिनेते अंकूश चौधरी, क्रिकेटर उमेश यादव यांनी उपस्थित राहून उपस्थित विशाल जनसमुदायाचा उत्साह वाढविला. काही देशांतील वाणिज्य राजदूतांनीही या महोत्सवाला हजेरी लावली लावून नागपूर शहराची ही खास परंपरा प्रत्यक्ष जाणून घेतली.

नागपूरची ही परंपरा विशेष असून मारबत महोत्सवाला १४५ वर्षांचा वैभवशाली इतिहास आहे. शहराचे वैशिष्ट्य असलेल्या मारबत-बडग्या मिरवणुकीच्या परंपरेला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळवून देण्यासाठी नागपूर महानगर पालिकेने पुढाकार घेऊन यावर्षी प्रथम मारबत महोत्सवाचे आयोजन केले. मारबत आणि विविध विषयांवरील बडग्यांची मिरवणूक मान्यवरांना पाहता यावी, यासाठी सेंट्रल अॅव्हेन्यूवरील गांधी पुतळा चौकात भव्य मंच उभारण्यात आला होता.

याप्रसंगी मंचावर नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अर्थ व नियोजन राज्यमंत्री अॅड. आशिष जयस्वाल, आमदार सर्वश्री कृष्णा खोपडे, मोहन मते, प्रवीण दटके, डॉ. राजीव पोतदार तसेच महापौर निता ठाकरे, उपमहापौर लीला हाथीबेड, फ्रांसचे वाणिज्यदूत पॅट्रीक लेवेरीनो, नॉर्वेच्या वाणिज्य दूत मोनिका निगलगार्ड, फिनलँडच्या वाणिज्यदूत पेट्रा थीमन या मान्यवरांची यावेळी उपस्थिती होती. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह इतर मान्यवरांच्या वतीने मिरवणुकीवर पुष्पवर्षाव करण्यात आला.

यावेळी उपस्थित असलेल्या विदेशी पाहुण्यांनीही या परंपरेमागील माहिती व इतिहास जाणून घेतला. स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे, सत्ता पक्षनेता नरेंद्र बोरकर, महापालिका



आयुक्त डॉ. विपीन इटनकर, माजी महापौर दयाशंकर तिवारी, माजी महापौर श्रीमती अर्चना डेहनकर यांच्यासह साम टीव्हीचे संपादक श्री. निलेश खरे, एबीपी माझाच्या संपादक सरिता कौशिक, प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर, ग्राफीक डिझायनर विवेक रानडे यांनीही या महोत्सवाला हजेरी लावली.

**नागपूरच्या परंपरेला जागतिक स्वरूप देण्याचा प्रयत्न स्तुत्य-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

नागपूरच्या या परंपरेला जागतिक स्वरुप देण्याचा हा प्रयत्न निश्चितपणे स्तुत्य आहे.

या शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महापालिकेच्या वतीने आयोजित या महोत्सवाचे कौतूक केले. महोत्सवाच्या यशस्वी आयोजनाबद्धल त्यांनी महापालिकेच्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. यावेळी मुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी महाराष्ट्रातील सामान्य माणसांच्या जीवनात असणाऱ्या सर्व समस्या दूर व्हाव्यात, अशी इच्छा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

# यंदा गणेशोत्सवावर दुष्काळ आणि महागाईचे सावट

## गणेश मंडळांपुढे आर्थिक संकट: मोठ्या गणेश मूर्तींना पसंती इतर साहित्यांत ही झाली वाढ



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१३, अहिल्यानगर :** गणेशोत्सवाला आजपासून सुरुवात होत आहे. गणेशोत्सवाच्या स्वागतासाठी बाजारपेठा सजल्या आहेत. ठिकठिकाणी गणेश मंडळांनी मंडप उभारले आहेत. बाजारात मखर, सजावटीचे तसेच गणरायाच्या मोहक मूर्ती पाहायला मिळत आहे. मात्र, यंदा राज्यात पाऊस कमी पडल्यामुळे सर्वत्र दुष्काळग्रस्त परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे यंदाच्या गणेशोत्सवावर महागाईचे आणि दुष्काळाचे संकट ओढावले आहे.

**२ महिन्यापासून पाऊस गायब**

'अल निनो'च्या प्रभावामुळे मागील दोन महिन्यांपासून पावसाने दडी मारली आहे. राज्यात सर्वत्र दुष्काळाचे सावट पसरल्याचे पाहायला मिळत आहे. पुरेशा पाण्याअभावी पिके जळू लागली आहेत. यामुळे बळीराजा पुन्हा एकदा संकटात सापडला आहे.

राज्यावर दुष्काळाचे संकट ओढावले आहे. पावसाळा सुरू झाल्यानंतर सुरुवातीला काही भागात समाधानकारक पाऊस झाला होता. त्यामुळे शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने पेरण्या उरकल्या. मात्र, त्यानंतर अल निनो सक्रिय झाल्याने पावसाने दडी मारली. दीड महिन्यापासूनपाऊस गायब असल्याने. पाण्याअभावी सोयाबीन, कपाशी, मका, ज्वारी आणि बाजरी यांसारखी खरिपाची पिके जळू लागली आहेत. बळीराजा मेटाकुटीला आला आहे. हवामान विभागाने १७ सप्टेंबर नंतर पावसाचा अंदाज वर्तवला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.

**ग्राहकांची खरेदीसाठी लगबग**

सध्या सर्वत्र गणेशोत्सवाची जोरदार तयारी सुरू आहे. ठिकठिकाणी मंडप देखील उभारण्यात आले आहेत. बाजारपेत आकर्षक गणपती मूर्ती,मखर तसेच सजावटीच्या वस्तूंचे स्टॉल्स लगले आहेत. बाजारात ग्राहकांची खरेदीसाठी लगबग सुरू झाली आहे. बाजारात पीओपीच्या मूर्तींना मोठ्याप्रमाणात मागणी आहे. शाडू मातीच्या मूर्तींच्या तुलनेत पीओपीच्या मूर्ती स्वस्त, वजनाने हलक्या आणि वाहतूकीस सुलभ असल्याने नागरिक त्यांना पसंती देत आहेत. पण या सगळ्याचे दर पहाता मोठ्या प्रमाणावर सामान्यांना महागाईचा फटका बसणार आहे.

------------------------------------------------------------

**गणेशमूर्तींच्या दरात ३० टक्क्यांनी वाढ**

कच्च्या मालाच्या वाढलेल्या किमतीमुळे गणेशमूर्तींच्या दरात सरासरी ३० टक्क्यांची वाढ झाली आहे. पेट्रोल - डिझेलचे दर वाढल्यामुळे वाहतुकीचा खर्च वाढला आहे. आखाती देशांतील युद्ध, पावसाने दडी मारल्यामुळे बळीराजा आकाशाकडे डोळे लावून हवालदिल झाला आहे. व पीओपीच्या दरवाढीचा परिणाम बाप्पाच्या मूर्तींवर झाला आहे. सजावटीचे साहित्य त्याचबरोबर कच्च्या मालासाठी वाहतूक खर्च या सगळ्याचा ताण मूर्तिकारांवर पडत आहे. तर दुसऱ्या बाजूला जीवनावश्यक वस्तूंचे भाव गगनाला भिडल्याने सर्वसामान्य नागरिकांच्या खिशाला कात्री लागली आहे.

# दुचाकी चोराच्या एलसीबी ने आवळल्या मुसक्या; २.३० लाखांच्या चार दुचाकी हस्तगत

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१३, चंद्रपूर :** चंद्रपूर शहरासह जिल्ह्यात दुचाकी चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलिसांकडून सुरू असलेल्या कारवाईला मोठे यश मिळाले आहे. स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूरच्या पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे रेकॉर्डवरील संशयित दुचाकी चोराला ताब्यात घेत त्याच्याकडून तब्बल २ लाख ३० हजार रुपये किमतीच्या चार दुचाकी हस्तगत केल्या आहेत. आरोपीच्या चौकशीत विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत घडलेले एकूण पाच दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. प्रतिक धनराज झाडे (३३), रा. महाकाली वॉर्ड, चंद्रपूर असे ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. आरोपी हा रेकॉर्डवरील असून, तो दुचाकी चोरीच्या घटनांमध्ये सहभागी असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने दुचाकी चोरीच्या आणखी घटनांची माहिती दिली. आरोपीने दिलेल्या माहितीच्या आधारे दुध डेअरी कॉलनी, चंद्रपूर परिसरातील झाडी-जंगलासह इतर ठिकाणांहून तीन दुचाकी हस्तगत करण्यात आल्या. हस्तगत करण्यात आलेल्या वाहनांमध्ये टीव्हीएस मोटारसायकल एमएच-३४-बीयु-५२१७ (किंमत ४० हजार रुपये), होंडा अॅक्टिव्हा मोपेड एमएच-३४-सीए-४४१३ (किंमत ५० हजार रुपये), होंडा अॅक्टिव्हा मोपेड एमएच-३१-एफएल-७९२८ (किंमत ८० हजार रुपये) आणि हिरो स्प्लेंडर प्लस एमएच-३४-एजी-६८३९ (किंमत ६० हजार रुपये) यांचा समावेश आहे.

यापैकी होंडा अॅक्टिव्हा एमएच-३४-सीए-४४१३ ही रामनगर पोलीस ठाण्यातील अपराध क्रमांक ७३९/२०२६, तर एमएच-३१-एफएल-७९२८ ही



अॅक्टिव्हा बर्डी पोलीस ठाणे, नागपूर येथील अपराध क्रमांक ५०६/२०२६ मधील चोरीची असल्याचे तपासात समोर आले आहे. दरम्यान, आरोपीने बल्लारशाह पोलीस ठाण्याच्या हद्दीतून चोरी केलेली पॅशन प्रो मोटारसायकल माणिकगड, राजुरा परिसरात बेवारस अवस्थेत सोडून दिल्याचेही तपासात निष्पन्न झाले. सदर मोटारसायकल पोलिसांनी यापूर्वीच जप्त केली आहे.

त्यामुळे या कारवाईत एकूण पाच दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. आरोपीच्या ताब्यात टीव्हीएस कंपनीची मोटारसायकल क्रमांक एमएच-३४-बीयु-५२१७ आढळून आली. पोलिसांनी या वाहनाची माहिती तपासली असता ते पडोली पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या अपराध क्रमांक २९१/२०२६, कलम ३०३(२), भारतीय न्याय संहिता अंतर्गत नोंदविलेल्या चोरीच्या गुन्ह्यातील असल्याचे निष्पन्न झाले. यानंतर पोलिसांनी आरोपीची सखोल चौकशी केली.

या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने चार दुचाकी, एकूण किंमत २ लाख ३० हजार रुपये, हस्तगत केल्या आहेत. आरोपीची वैद्यकीय तपासणी केल्यानंतर त्याला पुढील कायदेशीर कारवाई व तपासासाठी पडोली पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. दुचाकी चोरीच्या आणखी घटनांमध्ये त्याचा सहभाग आहे का, याचा तपास पोलीस करीत आहेत. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांचा नेतृत्वात उपविभाग चंद्रपूर पथक यांनी केले.

# शाहगंजमध्ये लोकसेवा ऑनलाइन कॅम्पला उत्स्फूर्त प्रतिसाद

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.१३, परभणी :** परभणी शहागंज परिसरातील नागरिकांना विविध शासकीय व ऑनलाइन सेवा सहज उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शामेर अंसारी मित्र मंडळ व शाहगंज परिसरातील तरुणांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या लोकसेवा ऑनलाइन कॅम्पला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कॅम्पमध्ये परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत विविध ऑनलाइन सेवांचा लाभ घेतला.आजच्या डिजिटल युगात अनेक शासकीय कामांसाठी नागरिकांना ऑनलाइन प्रक्रिया पूर्ण करावी लागते. मात्र, तांत्रिक अडचणी, माहितीचा अभाव किंवा ऑनलाइन अर्ज प्रक्रियेची पुरेशी माहिती नसल्यामुळे नागरिकांना अनेकदा अडचणींचा सामना करावा लागतो. ही बाब लक्षात घेऊन शाहगंज परिसरातील तरुणांनी पुढाकार घेत नागरिकांना आवश्यक ऑनलाइन सेवा उपलब्ध करून देण्यासाठी या कॅम्पचे आयोजन केले. कॅम्पदरम्यान नागरिकांना विविध ऑनलाइन प्रक्रियेसंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. त्यामुळे परिसरातील नागरिकांना आपल्या



कामांसाठी दूरवर जाण्याची गरज न पडता स्थानिक पातळीवरच सुविधा उपलब्ध झाली. या उपक्रमाचे नागरिकांकडून कौतुक करण्यात आले.सेवा, सहकार्य आणि एकतेचा संदेश देणाऱ्या या उपक्रमातून शाहगंज परिसरातील तरुणांची सामाजिक बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित झाली. भविष्यातही अशाच प्रकारचे नागरिकोपयोगी उपक्रम राबविण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले.हा कॅम्प यशस्वी करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व तरुणांचे, मित्र मंडळाच्या सदस्यांचे तसेच अंसारी मल्टी सर्विसेसचे मुजाहेद भाई यांचे आयोजकांच्या वतीने मनःपूर्वक आभार मानण्यात आले.या वेळी अध्यक्ष शामेर अंसारी उर्फ शामेर अण्णा, इमरान खान, शेख सुलेमान, तबरेज अंसारी, शेख नदीम, जुनैद अन्सारी, शेख उमेर, नेहल अन्सारी, जाफर खान, शेख इर्शाद, मुसैफ अन्सारी आणि सय्यद अदनान यांच्यासह मित्र मंडळाचे सदस्य व शाहगंज परिसरातील अनेक तरुण उपस्थित होते.

# महानिर्मितीचा उदापूर येथील १०० मेगा वॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१३, नागपूर :** महानिर्मिती तर्फे विकसित करण्यात आलेला उदापूर ता.नरखेड, जि.नागपुर येथील १०० मेगा वॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प दिनांक ११ सप्टेंबर २०२६ रोजी महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी. (भा.प्र.से), यांचे हस्ते यशस्वी प्रथम कार्यान्वित करण्यात आला. ४१० एकर जमिनीवर उभारण्यात आलेला हा सौर ऊर्जा प्रकल्पद्वारे निर्मित वीज वरुड कळमेश्वर २२० केव्ही वाहिनी वरती १३ किमी लांब डबल सर्किट वाहिन्या द्वारे ग्रीडम सोबत जोडण्यात आली आहे.

मुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वामध्ये उदापूर सौर ऊर्जा प्रकल्प उभारणी प्रक्रिया सुलभपणे महानिर्मिती तर्फे राबविण्यात आली.म हानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन. बी. (भा.प्र.से.) यांच्या निर्देशानुसार व संचालक (संचलन) अभय हरणे, संचालक (प्रकल्प) राजेश पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार सदर प्रकल्प म हानिर्मितीमार्फत विकसित करण्यात आला असून त्यामुळे महाराष्ट्रातील जनतेला विश्वासार्ह हरित वीजपुरवठा साध्य होणार असून या प्रकल्पामुळे रोजगारनिर्मिती उपलब्ध होणार आहे.महाराष्ट्र शासनाने सन २०३० पर्यंत ५२ टक्के




ऊर्जा निर्मिती अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांकडून करण्याचे उद्दिष्ट ठेवले असून त्याला अनुरूप महानिर्मितीने व्हिजन २०३५ आखले आहे. यामध्ये महानिर्मितीची स्थापित क्षमता सन २०३० पर्यंत ८००० मेगावॅट आणि सन २०३५ पर्यंत १२००० मेगावॅट स्थापित क्षमतेचे ऊर्जा प्रकल्प उभारणीचे लक्ष्य निर्धारित केले आहे. तसेच नवीकरणीय उर्जानिर्मितीकरता सौर, उदंचन जल विद्युत प्रकल्प, पवन - सौर हाय ब्रीड प्रकल्प, ग्रीन हायड्रोजन आणि बॅटरी स्टोरेज प्रणालीसारख्या अत्याधुनिक प्रकल्पांचा यामध्ये समावेश आहे. यापैकी एक म हत्वपूर्ण टप्पा म्हणजे १०० मेगावॅट स्थापित क्षमतेचा नागपूर जिल्ह्यातील उदापूर सौर ऊर्जा प्रकल्प ठरला आहे. महानिर्मिती तर्फे प्रकल्प विकसित करण्याकरिता निविदा प्रक्रियेद्वारे मे. के. पी. आय. ग्रीनएनर्जी लि यांची सौर प्रकल्प विकासक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

या प्रसंगी राजेश पाटील, संचालक (प्रकल्प), विवेक रोकडे,कार्यकारी संचालक (प्रकल्प), गिरीश कुमारवार, कार्यकारी संचालक (सौर, न.ऊ.प्र), विलास मोटघरे, मुख्य अभियंता (नविकरणीय ऊर्जा प्रकल्प) नागपूर तसेच सतीश अणे, मुख्य अभियंता (महापारेषण) यांची विशेष उपस्थिती लाभली. मे. के. पी.आय ग्रीनएनर्जी लि.चे नेगी, समाझ हुसैन, नितीश नाखले तसेच महीपाल रेड्डी, सौरभ मित्तल आणि म हानिर्मितीचे अभियंता,कर्मचारी उपस्थित होते.

मुख्य अभियंता (नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प) विलास मोटघरे, संजय कुऱ्हाडे तसेच प्रकल्प उभारणी चमूचे महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.), संचालक (संचलन) अभय हरणे, संचालक (प्रकल्प) राजेश पाटील ,संचालक (वित्त) मनेष वाघीरकर आणि कार्यकारी संचालक (सौर, अपारंपारिक ऊर्जा (प्रकल्प)) गिरीश कुमारवार ह्यांनी विशेष अभिनंदन केले आहे.

# कचरा डेपो विरोधात फुरसुंगीत नागरिकांची विशेष सभा !

**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.१३, फुरसुंगी (पुणे) :** फुरसुंगी देवाची नगरपरिषद हळदी मधील वाढीव घनकचरा प्रक्रिया प्रकल्पास विरोध दर्शविण्यासाठी आज फुरसुंगी मधील नागरिकांच्या विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते.

फुरसुंगी उरळी देवाची या दोन्ही गावांच्या हद्दीम ध्ये पुणे महानगरपालिकेचा कचरा डेपो १९९३ साली सुरू झाला व तेव्हापासून या दोन्ही गावातील नागरिक या कचरा डेपोला विरोध करत आहे २०१६ साली २८ दिवस चालू असलेल्या आंदोलनाला स्थगिती देण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी या गावातील नागरिकांना कचरा समस्येपासून मुक्त करण्यासाठी आश्वासित केले होते त्यामध्ये प्रम ुख बाबींमध्ये या डेपो वरती गेल्या अनेक वर्षांपासून पडलेला ५७ लाख टन कचरा प्रोसेस केला जाईल व ही जागा रिकामी करून या ठिकाणी गार्डन विकसित करण्यात येईल तसेच येथील काही जमिन या ठिकाणी असणाऱ्या शेतकऱ्यांना परत देण्याचे आश्वासन देण्यात आले होते तसेच या ठिकाणी ओपन डम्पिंग करणे व पुण्याचा कचरा पुण्याच्या चारी बाजूला विकेंद्रीकरण करून विल्हेवाट करण्यात येणार असल्याचे आश्वासन देण्यात आले होते परंतु गेले दहा वर्षात असे कोणतेही



प्रकारचे काम पुणे महानगरपालिकेकडून न झाल्यामुळे ग्रामस्थांनी आंदोलनाचा पवित्र घेतला व ३४ दिवस आंदोलन केले सुप्रियाताई सुळे यांच्या मध्यस्थीमुळे सदर आंदोलन १८ तारखेपर्यंत स्थगित करण्यात आले.

याबाबत फुरसुंगी उरुळी देवाची नगरपरिषदेत आज कृती समितीच्या मागणीनुसार गाव सभा घेण्यात आली व चिकन मटन वेस्ट व नव्याने होणारा ५०० मॅट्रिक्ट टन कचरा प्रक्रिया प्रकल्पासाठी नागरिकांची मते जाणून घेतली. यामध्ये नागरिकांसह फुरसुंगी-उरुळी देवाची नगर परिषदेमधील नगरसेवकांनी देखील सदर प्रकल्पाला विरोध करून न्यायालयीन लढा देण्याचे ठरले.

यामध्ये प्रामुख्याने कृती समितीचे पदाधिकारी विशाल नाना हरपळे, ज्ञानेश्वर दादा कामठे, रणजीत रासकर, विराज करचे, शादाब मुलानी, भूपेंद्र बेंगळे, सचिन शितोळे, प्रतीक हरपळे, रामभाऊ हरपळे, अक्षय हरपळे, अनिकेत काळे, राहुल हरपळे, निलेश पवार, उल्हास शेवाळे, सुजित सिंग, परदेशी दिलीप, मयूर हरपळे, प्रकाश काका शेवाळे, भापकर वैभव हरपळे, प्रदीप सरोदे, नंदू चौधरी, सुरज गायकवाड, दत्ता करचे, मुन्ना मुलानी, महेश कामठे, उत्तम कामठे, सुहास भाडळे, नंदू बापू हरपळे, प्रल्हाद कामठे, धनंजय काम ठे, संदीप कामठे तसेच महिलाही मोठ्या बहुसंख्येने उपस्थित होत्या.

यामध्ये राणीताई थोपटे, नंदा पाठक, चैत्राली हरपळे, सारिका पवार, सुप्रिया भाडळे, नीता भाडळे, वैशाली पवार, इनामदार भाभी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष संतोष सरोदे, उपनगराध्यक्ष ॲड.ओंकार कामठे, नगरसेवक गणेश ढोरे, संतोष पवार, चंद्रकांत ढमाळ, संतोष हरपळे, गणेश कामठे, स्वीकृत नगरसेवक रमेश निवंगुणे, संतोष आबनावे, महेश हरपळे, गिरीश ढोरे, नगरसेविका मोनिका पवार, अमृता कामठे, विशाखा हरपळे, उषाताई ढोरे, पल्लवी आबनावे, स्नेहल जवंजाळ सुकन्या शेवाळे तसेच नागरिकही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षणानेच जीवनात बदल होऊ शकतो आ.अमरिशभाई पटेल यांचे प्रतिपादन

**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.१३, शिरपूर :** शिरपूर, ग्रामीण आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांम ध्ये प्रचंड गुणवत्ता आहे. त्यांना योग्य संधी, मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मिळाले, तर ते राज्य, देशच नव्हे तर जागतिक पातळीवरही आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवू शकतात. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना व्यासपीठ मिळावे आणि त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण व्हावा, यासाठी अशा स्पर्धांचे आयोजन सातत्याने झाले पाहिजे. शिक्षणानेच माणसाच्या जी-वनात खरा बदल घडू शकतो. स्वतःची प्रगती साधतानाच समाज आणि देशाच्या विकासात योगदान देण्याची भावना मनात ठेवावी. प्रत्येक विद्यार्थ्याला उत्तम शिक्षण आणि पुढे जाण्याची संधी मिळावी, हीच आपली भूमिका आणि आपले ध्येय आहे, असे प्रतिपादन म ाजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल यांनी केले.

आमदार अमरिशभाई पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त शिरपूर तालुकास्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धे चे आयोजन राजगोपाल चंदुलाल भंडारी हॉल, आर. सी. पटेल मेन बिल्डिंग, शिरपूर येथे १२ सप्टेंबर रोजी सकाळी उत्साहपूर्ण वाता-वरणात करण्यात आले.

कार्यक्र माच्या प्रारंभी सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून आमदार अमरिशभाई पटेल यांच्या हस्ते स्पर्धे चे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुण्या संस्था ट्रस्टी सौ. जयश्रीबेन पटेल, ट्रस्टी सौ. कृतिबेन पटेल, ट्रस्टी सौ. स्नेहादीदी पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, खजिनदार बबनराव अग्रवाल, गोपाल




भंडारी, अतुल भंडारी, विजय भंडारी, उपनगराध्यक्षा सौ. संगिता देवरे, देवेंद्र पाटील, संचालक मंडळ, अधिकारी, सीईओ डॉ. उमेश शर्मा, अकॅडमीक इन्च- ार्ज पी. व्ही. पाटील, विविध शाखांचे प्राचार्य, मुख्याध्यापक, शिरपूर तालुक्यातील पदाधिकारी, नागरिक, तालुक्यातील इंग्रजी शिक्षक, स्पर्धक विद्यार्थी उपस्थित होते. इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत ५०० हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग : कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात मुख्याध्यापक प्रदीप गहिवरे यांनी तालुकास्तरीय

इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यामागील उद्देश व पार्श्वभूमी स्पष्ट केली. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणे, त्यांना आपल्या विचारांची प्रभावीपणे मांडणी करण्याची संधी देणे आणि इंग्रजी भाषेचा आत्मविश्वासाने वापर करण्यास प्रोत्साहन देणे हा स्पर्धेचा प्रमुख हेतू असल्याचे त्यांनी सांगितले.

**स्पर्धेतील विविध गटांतील विजेत्यांमध्ये**

**ग्रामीण लहान गट**

प्रथम श्रुती पंकज पाटील (आर. सी. पटेल प्राथमिक शाळा, टेकवाडे), द्वितीय ध्रुव जगदीश पाटील (आर.सी. पटेल प्राथमिक शाळा टेकवाडे), तृतीय ध्रुवी अमोल परदेशी (जिल्हा परिषद शाळा, पळासनेर).

**ग्रामीण मोठा गट**

प्रथम नेहा राजेंद्र बंजारा (जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बभळाज), द्वितीय आशिया कालू खाटीक (जिल्हा परिषद शाळा दहिवद), तृतीय गायत्री अनिल धनगर (आर.सी. पटेल प्राथमि क शाळा टेकवाडे).

**शहरी लहान गट**

प्रथम स्वरांश मिलिंद सोनवणे (आर.सी. पटेल मराठी प्राथमिक शाळा, शिरपूर), द्वितीय रियल हरीश बारी (एच. आर. पटेल कन्या प्राथमिक शाळा, शिरपूर), तृतीय प्रणिता चेतन जाधव (एच. आर. पटेल कन्या प्राथमि क शाळा, शिरपूर).

**शहरी मोठा गट**

प्रथम नचिकेत कैलास कोळी (आर.सी. पटेल मराठी प्राथमिक शाळा, शिरपूर), द्वितीय कुमुदिनी राहुल सनेर (एच. आर. पटेल कन्या प्राथमिक शाळा, शिरपूर), तृतीय आरोही ज्ञानेश्वर सोनवणे (आर. सी. पटेल मराठी प्राथमिक शाळा, शिरपूर). **आश्रम लहान गट**

प्रथम आरुषी रुस्तम पावरा (आर. सी. पटेल आश्रमशाळा, असली), द्वितीय वैष्णवी सुरेश पावरा (आर. सी.पटेल आश्रमशाळा, असली), तृतीय मेहुल भरत पावरा (आर.सी. पटेल आशमशाळा, वाघाडी).

आशमशाळा मोठा गट प्रथम भावेश राकेश पावरा (आर.सी. पटेल आशमशाळा, असली), द्वितीय पियुष जितेंद्र पावरा (आर.सी. पटेल आश्रम शाळा, निमझरी), तृतीय नेहा अशोक पावरा (आर.सी. पटेल आशमशाळा, शिरपूर). इंग्लिश मीडियम लहान गट प्रथम त्रिशा ज्ञानेश्वर थोरात (मुकेश आर. पटेल इंग्लिश मीडियम स्कूल, शिरपूर), द्वितीय जीवेश अजितसिंग राजपूत (आर.सी. पटेल इंग्लिश मीडियम स्कूल, शिरपूर), तृतीय दिव्या राहुल शहा (अमरिशभाई आर. पटेल सीबीएसई स्कूल, शिरपूर).

**इंग्लिश मीडियम मोठा गट**

प्रथम ग्रीष्मा सुमित अग्रवाल (अम रिशभाई आर. पटेल सीबीएसई स्कूल, शिरपूर), द्वितीय आरोही दीपक चावला (मुकेश आर. पटेल इंग्लिश मीडियम स्कूल, शिरपूर), तृतीय कैवल्य रवींद्र पाटील (आर.सी. पटेल इंग्लिश मीडियम स्कूल, शिरपूर), तृतीय अनुश्री नंदकिशोर पाटील (मुकेश आर. पटेल इंग्लिश मीडियम स्कूल, शिरपूर), तृतीय अनिशा विजय भंडारी (अमरिशभाई आर. पटेल सीबीएसई स्कूल, शिरपूर).

स्पर्धेचे परीक्षक म्हणून संस्थेच्या म ाध्यमिक विभागातील इंग्रजी शिक्षकांनी जबाबदारी पार पाडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक पाटील व सचिन बागुल यांनी केले. आभार प्रदर्शन मुख्याध्यापक विवेकानंद ठाकरे यांनी केले.

## थोडक्यात बातम्या

### बालगोपाळांच्या सहभागाने रंगला तान्हा पोळा; विविध स्पर्धांमध्ये विजेत्यांचा गौरव

**अक्षराज : दिवाकर घेर**



**दि.१३, नागपूर :** प्रभाग क्रमांक ४, भीम नगर, खापरखेडा येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही तान्हा पोळा उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला. या सोहळ्यात परिसरातील अनेक बाल गोपाळांनी उत्स्फ ूर्त सहभाग नोंदवत पारंपरिक संस्कृतीचा सुंदर आविष्कार घडवून आणला.तान्हा पोळ्यानिमित्त आयोजन समितीच्या वतीने वेशभूषा, नंदी सजावट तसेच सामाजिक संदेश आणि प्रश्नोत्तर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. प्रश्नोत्तर व संदेश स्पर्धेत आराध्या वानखेडे हिने प्रथम क्रमांक, अवनी सोमकुवर व शील बागडे यांनी द्वितीय क्रमांक, वंशिका कुडवे हिने तृतीय क्रमांक, तर सक्षम भूमरकर याने चतुर्थ क्रमांक पटकावला.उत्कृष्ट वेशभूषा स्पर्धेत प्रथम क्रमांक विहान डोंगरे, द्वितीय क्रमांक श्रावणी थोरात, तर तृतीय क्रमांक अर्णव पायतोडे यांनी मिळविला. तसेच नंदी उत्कृष्ट सजावट स्पर्धेत प्रथम क्रमांक मंथन सावरकर, द्वितीय क्रमांक अन्वी म्हल्ले, तर तृतीय क्रमांक मीरा राऊत यांनी पटकावला. विजेत्यांना रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेतील प्रथम पारितोषिक स्पोर्ट्स सायकल वासूजी कश्यप व महेश रंगारी यांच्या वतीने, द्वितीय पारितोषिक सायकल विलास म्हल्ले व धीरज देशभ्रतार यांच्या वतीने, तर तृतीय पारितोषिक कॅरम बोर्ड हिमांशू बत्रा यांच्या वतीने देण्यात आले.

विशेष म्हणजे, तान्हा पोळ्यात सहभागी झालेल्या प्रत्येक बालगोपाळाला आयोजन समिती व VGAAcademy यांच्या वतीने LCDWRiting Tablet तसेच आकर्षक भेटवस्तू देण्यात आल्या. मोबाईलचा स्क्रीन टाइम कमी करून मुलांमध्ये लेखन, चित्रकला व सर्जनशीलतेची आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने LCD WRiting Tablet देण्याचा उपक्रम विशेष कौतुकाचा ठरला. या कार्यक्रमासाठी डॉ.सुवर्णा जांभुळकर, नरेंद्र पुन, हिमांशू बत्रा विशाल वांढरे, प्रिती इंगोले व जयश्री नारनवरे यांनी परीक्षक म्हणून सौजन्यपूर्ण भूमिका बजावली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रितेश वानखेडे, सुमित इंगोले, उमेश नारनवरे, अविनाश पाटील, धीरज देशभ्रतार, सुरेंद्र सोमकुवर, हिमांशू बत्रा, अमोल निकोसे, आशिष धनविजय, ऋषभ शंभरकर, अनिल चव्हाण, दिनेश वानखेडे, संदीप पाटील, रोशन कुडवे यांच्यासह आयोजन समितीतील सदस्यांचे विशेष सहकार्य लाभले. पारंपरिक संस्कृतीची जपणूक, बालगोपाळांच्या कलागुणांना व्यासपीठ आणि सामाजिक संदेशाची जोड देत भीम नगर येथील तान्हा पोळा उत्सव आनंददायी वातावरणात संपन्न झाला.

### कान्हूरपठारला गौराई यात्रेची सांगता; पैलवानांनी कुस्त्यांचा आखाडा गाजवला

**अक्षराज : वसंत रांधवण**



**दि.१३, अहिल्यानगर :** पारनेर तालुक्यात प्रसिद्ध असलेल्या श्रावणी बैलपोळ्याच्या दुसऱ्या दिवशी कान्हूरपठार येथे भरणाऱ्या पारंपरिक गौराई यात्रेची विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी सांगता झाली. यानिमित्त ग्रामस्थांच्या वतीने आयोजित केलेल्या जंगी कुस्त्यांच्या आखाड्यात नामवंत पैलवानांनी हजेरी लावत आखाडा गाजवला.

पठार भागाचे मध्यवर्ती ठिकाण असलेल्या कान्हूरपठारमध्ये वर्षभरात दुसरी मोठी यात्रा नसल्याने गावात मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. यात्रेत मिठाई, पाळणे, शेती उपयोगी साहित्य, खेळणी, मनोरंजनाची साधने व महिलांच्या सौंदर्यप्रसाधन साहित्याच्या दुकानांमुळे मोठी आर्थिक उलाढाल झाली. विशेषतः पठार भागातील महिलांसाठी ही यात्रा पर्वणीच ठरली. दुपारी ४ वाजता महिलांनी मानाच्या गौराईचे विधिवत पूजन केले. यानंतर मानाच्या गौराई, ताराबाई ठुबे व ज्योती सागर ठुबे यांच्या गौराईची महिलांनी गावातून वाजतगाजत मिरवणूक काढली. मिरवणुकीनंतर गौराईचे विसर्जन करण्यात आले. तर दुपारी ३ वाजता टेकाडे वस्तीजवळ ग्रामस्थांनी आयोजित केलेला जंगी कुस्त्यांचा आखाडा भरण्यात आला. यावेळी परराज्यातून आलेल्या मल्लांसह अनेक नामवंत पैलवानांनी आखाड्यात उतरून नेत्रदीपक कुस्त्या केल्या. कुस्ती पाहण्यासाठी कुस्तीशौकीन ग्रामस्थ, मान्यवर, पदाधिकारी व पाहुणे मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विजेत्या मल्लांना ग्रामस्थांच्या वतीने हजारो रुपयांची बक्षिसे देण्यात आली. तसेच काही ग्रामस्थांनी वैयक्तिकरित्याही आखाड्यात कुस्त्या लावल्या.

### पुण्यातून पळाला, बेंगळुरूत लपला; बेळगावात युनिट-४ने पकडला

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.१३, पुणे :** चार वर्षांपासून खून व मोक्का गुन्ह्यात फरार असलेल्या पाहिजे आरोपीचा पुणे गुन्हे शाखा युनिट-४च्या पथकाने कर्नाटकातील बेळगावपर्यंत माग काढत जेरबंद केले. या कारवाईत पोलीस हवालदार अमजद शेख यांनी गोपनीय बातमीदारामार्फत मिळविलेल्या माहितीची महत्त्वाची भूमिका ठरली. मोईनुद्दीन जाफर शेख ऊर्फ मोईन कालु शेख (वय २८) असे ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव आहे.

येरवडा पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध खून, खंडणी, धमकी तसेच महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये गुन्हे दाखल आहेत. आरोपी कर्नाटकात असल्याची माहिती अमजद शेख यांना मिळाल्यानंतर युनिट-४ पथकाने त्याच्या हालचालींचा तांत्रिक पद्धतीने माग काढला. आरोपी बेंगळुरू परिसरात असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर ११ सप्टेंबर रोजी पथकाने तेथे वेशांतर करून पाळत ठेवली. पोलिसांची चाहूल लागताच आरोपीने तेथून पळ काढला. त्यानंतर तांत्रिक माहितीच्या आधारे त्याचा बेळगावपर्यंत पाठलाग करण्यात आला.

स्थानिक पोलिसांच्या मदतीने श्रीनगर चिल्ड्रेन गार्डन परिसरात सापळा रचून आरोपीला ताब्यात घेण्यात आले. पुढील कायदेशीर कारवाईसाठी त्याला येरवडा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक कांचन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक दिग्विजय चौगले, सहायक पोलीस फौजदार प्रविण राजपुत, पोलीस हवालदार अमजद शेख व तुषार खराडे, पोलीस अंमलदार अनिकेत भोसले, तसेच एकनाथ जोशी, जहांगिर पठाण आणि विठ्ठल वाव्हळ यांनी केली.